महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९८ /२०२२ दि. ०७/०७/२०२२

## –:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी**, कल्याण शहरात दि.१०/०७/२०२२ रोजी किंवा एक दिवस मागे पुढे (चंद्र दर्शनानुसार) मुस्लीम बांधवांचा "**बकरी ईद**" हा सण साजरा होणार आहे. बकरी ईद सणानिमित्त कल्याण शहरातील दुर्गाडी ईदगाह येथे सार्वजनिक नमाज पठणाचा कार्यक्रम होतो. तसेच त्याच दिवशी व त्याचवेळी शिवसेना पक्षा तर्फे दुर्गाडी किल्ल्यावर दुर्गामाता मंदिरात घंटानाद कार्यक्रम केला जातो. सदरवेळी हिंदु कार्यकर्त्यांना लाल चौकी–दुर्गामाता चौका दरम्यान रस्त्यावर बॅरिकेटींग करुन अटकाव केला जातो. दुर्गामाता चौकातील व कल्याण शहरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता, आम जनतेच्या सोयीसाठी.

**त्याअर्थी**, मी दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय १, ठाणे शहर अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालील प्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद –** १) कल्याण शहरातील लालचौकी कडुन भिवंडीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना लालचौकी येथे '**प्रवेश बंद**' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने लालचौकी येथे उजवीकडे वळण घेवुन आधारवाडी चौक–वाडेघर सर्कल मार्गे इच्छितस्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) भिवंडी कडुन कल्याण शहरातील आग्रारोड मार्गे गोविंदवाडी बायपास मार्गे कल्याण कडे जाणारे सर्व वाहनांना दुर्गामाता चौक येथे '**प्रवेश बंद**' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदची वाहने दुर्गामाताचौक येथे डावीकडे वळण घेवुन वाडेघर सर्कल–आधारवाडी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) कल्याण (पुर्व) कोळशेवाडी बाजूकडून गोविंदवाडी बायपास मार्गे दुर्गामाता चौकाकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना पत्रीपुल येथे '**प्रवेश बंद**' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने पत्रीपुल–शिवाजी चौक–लाल चौकी येथे उजवे वळण घेवून आधारवाडी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४)कल्याण शहराअंतर्गत दुर्गाडी चौक–गोविंदवाडी बायपास–पत्रीपुल मार्गे व दुर्गाडी चौक–शिवाजी चौक–पत्रीपुल मार्गे जाणाऱ्या कंटेनर, ट्रेलर, इत्यादी मल्टीएक्सल/जड–अवजड वाहनांच्या वाहतूकीस बकरी ईदच्या दिवशी पूर्ण वेळ दिवसा व रात्रौ सर्व वेळांत '**प्रवेश बंद**' करण्यात येत आहे.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही बकरी–ईद सणाचे दिवशी म्हणजेच दिनांक १०/०७/२०२२ रोजी किंवा एक दिवस मागे पुढे **(चंद्र दर्शनाप्रमाणे)** रात्रौ ००.०० ते नमाजाचा कार्यक्रम संपे पर्यंते अंमलात राहिल.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहन व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

(दत्तात्रय कांबळे)
पोलीस उप आयुक्त,मुख्यालय ०१
अतिरिक्त कार्यभार
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर .

मा.पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.

मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

(कृ.मा.पा.)

Scanned with CamScanner

मा.जिल्हाधिकारी, ठाणे
मा.आयुक्त,कल्याण–डोंबिवली महानगरपालिका
–प्रादेशिक परिवहन अधिकारी,कल्याण
–पोलीस उप आयुक्त,परिमंडळ–३,कल्याण
–पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर.
–पोलीस अधिक्षक,ठाणे ग्रामिण.
–पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा,नवी मुंबई.
–परिवहन व्यवस्थापक, कल्याण/डोंबिवली महानगरपालिका
–विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, कल्याण
–नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
प्रतः– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
प्रतः– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत–सपोआ–कल्याण व भिवंडी श.वा.शा.
प्रभारी अधिकारी–कल्याण,कोळशेवाडी,डोंबिवली,कोनगाव,भिवंडी श.वा.शा.

Scanned with CamScanner